# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. प्रकाश मल्लाप्पा बिराजदार ,<br>रा. करजगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रकाश मल्लाप्पा बिराजदार, रा. करजगी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे नमुना ' अ ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी वितरण कंपनीच्या संख उप विभागाकडे शेतीपंप नवीन विद्युत पुरवठा मागणी अर्ज दि. १४.१.२०१० रोजी करुन रु. ५०/– पोष्टाने संख कार्यालयास पाठविले.

त्यांचे म्हणण्यानुसार सर्व्हीस कनेक्शन असलेस २० दिवसांत व वितरण वाहिनीचा विस्तार असलेस ३० दिवसांत चलन मिळणे हे कृती मानकांनुसार आवश्यक आहे. तथापि असे चलन मला आजगातायत मिळालेले नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १४.१.२०१० ला तक्रार केली आहे. या मंचाकडून अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंतच्या तारखेपर्यंत झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. १५.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दि. २२.१.२०१० रोजी अर्ज केला असल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. ३.३.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराने चलन भरले नाही, टेस्ट रिपोर्ट दिला नाही. त्याची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल. त्यासाठी ०.१२ लघुदाब वाहिनीचे काम करावे लागेल. तक्रारदाराचा अर्ज अपूर्ण होता. ७/१२ चा उतारा हजर करण्यासाठी नोटीस दिल्यानुसार दि. १५.२.२०१० ला ७/१२ चा उतारा दिला. त्यामुळे चलन दि. ३.३.२०१० रोजी मुदतीत दिले आहे, तरी नुकसान भरपाईचा अर्ज फेटाळण्यात यावा असे वि.प. तर्फे प्रतिपादन करण्यात आले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

१) तक्रारदारास चलन मिळण्यास विलंब झाला आहे काय ?

उत्तर : नाही

२) आदेश ?

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

<u>कारणमिमांसा</u>

अर्जदाराच्या अर्जाच्या तारखेबद्दल वि.प.ने तो दि. २२.१.२०१० रोजी मिळाला असल्याचे नमूद केले आहे. परंतु तक्रारदाराने दि. १४.१.२०१० रोजी अर्ज व रु. ५०/– पोष्टाच्या मनिऑर्डरने संख उप विभागाकडे पाठविल्याचे नमूद केले आहे. असे असले तरी, वि.प.ने तक्रारदार यांस दि. २५.१.२०१० च्या पत्राने विहीरीवरील हक्कबाबत पुरावा सादर करण्यास कळविले. वि.प.च्या त्या पत्रावर ग्राहक प्रतिनिधींनी लेखी लिहून तक्ररदाराचा विहीरीवरील हक्क असलेबाबतचा ७/१२ सोबत जोडल आहे. यावरुन दि. १५.२.२०१० ला अर्जाची पूर्तता झाली असे गृहीत धरले तर ३ मार्चला म्हणजे २० दिवसांत चलन देण्यात आले असे अनुमान काढता येईल. एक गोष्ट कटाक्षाने येथे सांगाविशी वाटते की, दि. १२.५.२०१० च्या लेखी अहवालात वि.प.ने तक्रारदारास पत्र देवून त्यांचेकडून ७/१२ चा उतारा मिळाल्याचा उल्लेख केला नाही याचे गुपित वि.प.चे संबंधित अधिकारी सांगू शकतील. असे असले तरी, तक्रारदाराचे प्रतिनिधींनी वि.प.च्या दि. २५.१.२०१० च्या पत्रावर नोंद करुन विहीरीवर हक्क असलेला ७/१२ जोडला आहे. हे विलंबाबद्दल स्पष्टीकरण ग्राह्य धरणे योग्य होईल असे वाटते. त्यांना २० दिवसांत ३ मार्चला चलन देण्यात आले. तथापि दि. १४.१.२०१० चा अर्ज दि. १४.२.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते किंवा अर्ज दि. २२.१.२०१० ला प्राप्त झाला आहे असे गृहीत धरले तरी ३० दिवस वगळून दि. २१.२.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते ३ मार्चला देण्यात आले. त्यामुळे प्रथमदर्शनी १० दिवसांचा विलंब झाला आहे. अर्जदार यांचा त्वरीतच विहीरीवरील हक्काबाबत खुलासा मागवून तो प्राप्त झाल्याचे दिसते, त्यामुळे विलंब नाही हे स्पष्ट होईल. ७/१२ च्या उताऱ्यावर इतर हक्कामध्ये तक्रारदाराचा ५ आणे हिश्याची नोंद आहे. वि.प.चे अधिकारी श्री. दिवटे यांनी विलंब झालेला नाही तक्रार निकाली काढणेत यावी अशी विनंती केली. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे. तक्रारदाराची नुकसान भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :